ग्राहक गा-हाणे निवारण मंच
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.
Old Power House Premises, Dr.Ambedkar Road, Aurangabad. Phone: 0240 - 2336172

*No: CGRF/AZ/AUR/ R / 236 / 2009 / 70* *Date :-*

*To,*
*The Executive Engineer ( Administration)*
*O/O Superintending Engineer ,*
*O&M Rural Circle , M.S.E.D.C.L.*
*Aurangabad.*

*Sub:- Forwarding of grievance in respect of Ramesh B.Kamble,*
*Tal.Gangapur, Dist., Aurangabad.*
*( Consumer No.506560220601)*

*Dear Sir,*

*Please find enclosed herewith a copy of the grievance application received by the Forum from Ramesh B.Kamble,Waluj Tal.Gangapur, Dist., Aurangabad*

*The consumer has requested the Forum to pass interim order for not to disconnect his supply on account of incorrect bill.*

*You are requested to submit your para wise reply on the grievance at the time of hearing. The hearing in the matter will be held on 21.07.2009 at 11= 30 Hrs. onwards.*

*Encl: As above*

*Member/Secretary*
*CGRF(AZ) MSEDCL*
*Aurangabad.*

***Copy to:-*** *Ramesh B.Kamble,*
*Waluj, Tal.Gangapur,*
*Aurangabad*

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रा/२३६/२००९/७०**

**तक्रार दाखल दिनांक :- १५/०७/२००९**
**निकाल दिनांक :- ३१/०७/२००९**

**श्री रमेश बी. काबंळे,**
**रा. वाळुज, तालुका गंगापुर,**
**जिल्हा औरंगाबाद.**
**(ग्राहक क्र.५०६५६०२२०६०१) अर्जदार/ग्राहक**

**विरुध्द**

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत**
**ग्रामीण मंडळ औरंगाबाद.**

**गैरअर्जदार**

| | | |
|---|---|---|
| **कोरम** | **विष्णु अं. हंबिरे** | **अध्यक्ष** |
| | **हेमंत अ. कापडीया** | **सदस्य** |
| | **प्र. अ. सगणे** | **सदस्य/सचिव** |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक १५/०७/२००९ रोजी औरंगाबाद ग्रामीण मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, औरंगाबाद यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक २१/०७/२००९ रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) अर्जदाराने घरगुती वापरासाठी महावितरण कंपनीकडुन वीज पुरवठा घेतला असुन त्यांनी नियमीतपणे वीज बिलाचा भरणा केला आहे. त्यांनी जानेवारी २००९ या महीन्याचे रुपये ५६०/- रकमेचे वील बिल भरले आहे.पण ह्या रकमेची नोंद न घेता त्यांना वाढीव वीज बिल आकारण्यात आल्याचे अर्जदाराने म्हटले आहे.अर्जदाराने याबाबत केलेल्या तक्रारीची दखल घेण्यात न आल्यामुळे त्यांनी मंचात तक्रार दाखल केली असुन महावितरण कंपनीस सुधारीत वीज बिल तसेच मानसिक त्रासापोटी नुकसान भरपाई देण्याची विनंती मंचास केली आहे.

२) दिनांक २१/०७/२००९ रोजी झालेल्या सुनावणीस अर्जदार व नोडल अधिकारी उपस्थित नव्हते. महावितरण कंपनीच्या कर्मचा-यांचा संप असल्यामुळे सुनावणीची तारीख पुढे वाढविण्याचे पत्र नोडल अधिकारी यांनी मंचास पाठविले.मंचाने या प्रकरणाची पुढील सुनावणी २४/०७/२००९ रोजी घेण्याचे मान्य केले.

३) दिनांक २४/०७/२००९ रोजी अर्जदार उपस्थित नव्हते.महावितरण कंपनीचे नोडल अधिकारी एस.बी.चिंवडे यांनी अर्जदाराच्या तक्रारीवर आपला जवाब मंचात दाखल केला. अर्जदाराच्या सी.पी.एल.मध्ये श्री सबदे या नांवाच्या ग्राहकाने वीज बिलापोटी भरणा केलेल्या रक्कमेची चुकीची नोंद करण्यात आली असल्याचे सांगितले व नंतर ही रक्कम त्यांना देण्यात आलेल्या वीज बिलातुन वळती करुन घेण्यात आल्याचे आपल्या जवाबात सांगितले.

नोडल अधिकारी यांनी मंचासमोर सी.पी.एल.वरील नोंदी तसेच श्री सबदे यांच्या नांवाने ८६०/-रुपयाची वीज बिलाचा भरणा केल्याची पावती पुढील सूनावणीच्या वेळी दाखल करण्याचे मान्य केले. अर्जदार उपस्थित नसल्यामुळे त्यांना आपले म्हणणे मांडण्याची शेवटची संधी देत मंचाने पुढील सुनावणी २८/०७/२००९ रोजी घेण्याचे निश्चीत केले.

४) दिनांक २८/०७/२००९ रोजी अर्जदार गैरहजर होते. महावितरण कंपनीच्या नोडल अधिकारी एस.बी.चिंवडे उपस्थित होत्या. त्यांनी अर्जदार तसेच श्री सबदे यांचे सी.पी.एल व श्री सबदे यांच्या नांवाची वीज बिल भरणा केलेली पावती मंचात दाखल केली. अर्जदाराची तक्रार खोटी असल्याची सांगत ती खारीज करण्याची विनंती मंचास केली.

५) अर्जदाराने मंचात दाखल केलेली तक्रार व महावितरणच्या नोडल अधिकारी यांनी दाखल केलेली कागदपत्रे याचे निरीक्षण केल्यावर असे आढळुन येते की अर्जदाराने जुलै २००८ पर्यंत चा वीज बिलाचा भरणा केलेला आहे. ऑगस्ट २००८ ते ऑक्टोबर २००८ या काळात अर्जदाराने वीज बिलाचा भरणा केलेला दिसुन येत नाही. दिनांक १८/११/२००८ रोजी अर्जदाराच्या नांवावर ८६०/-रुपयाचा भरणा केल्याचे सी.पी.एल.मध्ये दाखविण्यात आले आहे पण प्रत्यक्षात ही रक्कम श्री सबदे यांनी भरली असल्याचे त्यांच्या नांवाने देण्यात आलेल्या पावतीवरुन स्पष्ट होते. अर्जदाराने डिसेंबर २००८ ते जानेवारी २००९ या काळात चुकीने नोंद घेण्यात आल्यामुळे त्यांना महावितरणतर्फे देण्यात आलेल्या वीज बिलाचा (रुपये ५६१.३५/-) भरणा दिनांक ०६/०३/२००९ रोजी केलेला दिसुन येतो.महावितरण कंपनीतर्फे मार्च २००९ मध्ये या चुकीची दुरुस्ती करण्यात येवुन अर्जदाराच्या वीज बिलात ८६०/- रकमेचा समावेश करण्यात आला असुन ते योग्य असल्याचे मंचाचे मत आहे.

वरील सर्व बाबीचे निरीक्षण केल्यावर अर्जदाराने फेब्रुवारी २००९ मध्ये महावितरण तर्फे देण्यात आलेल्या चुकीच्या वीज बिलाचा भरणा केल्यानंतर मार्च २००९ मध्ये थकबाकी दाखविण्यात आली या गैर समजुतीमुळे मंचात तक्रार दाखल केली असल्याचे दिसुन येते.

मंच याप्रकरणी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) महावितरण कंपनीतर्फे अर्जदारास देण्यात आलेले वीज बिल योग्य असुन अर्जदाराची तक्रार खारीज करण्यात येत आहे.

वरील आदेशाचे ग्राहक व महावितरण कंपनी यांनी पालन करावे व त्याबाबत मंचास कळवावे.

गा-हाणे निकाली काढण्यात आले असुन हे ग्राहकास व वितरण कंपनीस कळवावे.

| | | |
|---|---|---|
| **हेमंत अ. कापडिया** | **प्र. अ. सगणे** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य** | **सदस्य/सचिव** | **अध्यक्ष** |

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच

## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

**जुने पावर हाऊस परिसर.डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, मिल कॉर्नर, औरंगाबाद. - ४३१ ००१, दुरध्वनी व फॅक्स -०२४० - २३३६१७२.**

**क्र.सीजीआरएफ/एझेड/ग्रा/२३६/२००९/७०** **दिनांक :-**

**प्रति,**

श्री रमेश बी. काबंळे,
रा. वाळुज, तालुका गंगापुर,
जिल्हा औरंगाबाद.
(ग्राहक क्र.५०६५६०२२०६०१)

( तक्रार क्र.सिजीआरएफ/एझेड/ग्रा/२३६/२००९/७० )

आपण दिनांक १५/०७/२००९ रोजी दाखल केलेल्या तक्रारीवरील या मंचाचा आदेश सोबत जोडला आहे. हा आदेश मान्य नसल्यास आपण विद्युत लोकपाल यांच्याकडे ६० दिवसाच्या आंत अपिल दाखल करू शकता.

सदस्य/सचिव
ग्राहक गा-हाणे निवारण मंच
म.रा.वि.वि.कं.म.औरंगाबाद.

प्रती, सविनय सादर,
मुख्य अभियंता परिमंडळ कार्यालय,
म.रा.वि.वि.क.मर्या.औरंगाबाद.

प्रती,कार्यकारी अभियंता (प्रशासन),
अधिक्षक अभियंता यांचे कार्यालय,
म.रा.वि.वि.कं.म. ग्रामीण मंडळ, औरंगाबाद
माहिती व उचीत कारवाही करीता

विद्युतलोकपालाचा पत्ता,
विद्युत लोकपाल,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग,
६०६-६०८, केशवा, बांद्रा - कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई - ४०० ०५१.
दुरध्वनी क्र. ०२२-२६५९०३३९.